परिशिष्ट - १

# शिक्षणशास्त्र विद्याशाखा परिषद

## बैठक क्र.४४

## इतिवृत्त

## दिनांक १० ऑक्टोंबर २०१५

शिक्षणशास्त्र विद्याशाखा परिषदेची ४४ वी बैठक दिनांक १० ऑक्टोबर २०१५ रोजी सकाळी ११.३० वाजता मानव्य विद्या विद्याशाखा सभागृह, शैक्षणिक इमारत, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक येथे आयोजित करण्यात आली होती. या बैठकीसाठी पुढील सदस्य उपस्थित होते.

१) डॉ. संजीवनी महाले अध्यक्ष व प्र.संचालक, शिक्षणशास्त्र विद्याशाखा
२) प्राचार्य डॉ. नलिनी पाटील, सदस्य, एस.एन.डी.टी.बी.एड.कॉलोज, पुणे.
३) प्राचार्य डॉ. संजीवनी मुळे, सदस्य,शासकीय अध्यापक महाविद्यालय, बीड.
६) डॉ.प्रकाश देशमुख, प्र.संचालक, वाणिज्य व्यवस्थापन विद्याशाखा
५) डॉ.मनोज किल्लेदार, संचालक, विज्ञान व तंत्रविज्ञान विद्याशाखा
६) डॉ.सुरेंद्र पाटोळे , प्राध्यापक वाणिज्य विद्याशाखा
८) डॉ.सज्जन थूल प्र.संचालक,मूल्यमापन विभाग
९) डॉ.माधुरी सोनवणे ,प्राध्यापक कृषी विद्याशाखा
७) डॉ.कविता साळुंके सदस्य, शिक्षणशास्त्र विद्याशाखा (सचिव)
८) डॉ.विजया पाटील , सदस्य शिक्षणशास्त्र विद्याशाखा
९) श्री.विजयकुमार पाईकराव, सदस्य शिक्षणशास्त्र विद्याशाखा
१०) डॉ. माधवी धारणकर, सदस्य, शिक्षणशास्त्र विद्याशाखा
११) श्री.सोनुने एस.एस. निमंत्रित सदस्य, शिक्षणशास्त्र विद्याशाखा
१२) श्री.पवार डी.डी. निमंत्रित सदस्य, शिक्षणशास्त्र विद्याशाखा

सदर बैठकीस उपस्थित राहता येत नसल्याचे पुढील सदस्यांनी कळविलेले होते.
४) डॉ.सुरेश पाटील, सदस्य, शिक्षणशास्त्र विद्याशाखा
१) प्राचार्य डॉ.भूषण कर्डीले, सदस्य प्राचार्य के.के. वाघ बी.एड. महाविद्यालय
२) डॉ.वाय.एस.राव , सदस्य ,प्राचार्य जळगांव बी.एड.महाविद्यालय
३) डॉ.रेखा टोपकर,सदस्य ,प्राचार्य सांगली बी.एड.महाविद्यालय
५) डॉ.चंद्रशेखर चितळे, विव्दत परीषद सदस्य पुणे

सदर बैठकीतील उपस्थित सदस्यांचे स्वागत आणि कोरम पूर्ण असल्याची खात्री करून प्रत्यक्ष बैठकीस सुरुवात करण्यात आली, पुढील विषयांवर चर्चा करून निर्णय घेण्यात आले.त्यातील विषय क्र.४३.३.३,४३.३.४,४३.३.७ ची विद्वत परिषदेची मान्यता मिळावी म्हणून शिफारस करण्यात आली.

४४.२ विषय क्रमांक बी.-१ / एफ -१७५ / २०१५ /०२

दिनांक १३ मार्च २०१५ रोजी झालेल्या शिक्षणशास्त्र विद्याशाखा परिषद बैठकीचे इतिवृत्त आणि कार्यवृत्तास मान्यता देण्यात आली.

४४.३ सखोल चर्चेचे विषय

४४.३.१ विषय क्रमांक बी.-१ / एफ -१७५ / २०१५ /०१

पी.एच.डी. प्रवेशाबाबत....

टिप्पणी - यु.जी,सी,च्या परीपत्रकानुसार सर्व प्रक्रिया पूर्तता करुन शिक्षणशास्त्र विद्याशाखेने २०१५ वर्षासाठी पुढील आठ पी.एच.डी. विद्यार्थ्यांना (चार खुला प्रवर्ग व चार राखीव प्रवर्ग) प्रवेशित केले माहितीस्तव सादर
१.श्री.पोरे सचिन २.श्री.वैद्य दयाशंकर ३.श्री.ढेरे राहूल ४.श्रीमती लष्करे ज्योती ५. श्रीमती थोरात अनिता ६. श्रीमती साळुंके कल्पना ७. श्रीमती शुभदा काटकर ८.श्रीमती बागुल विद्यादेवी

ठराव - पी.एच.डी.शिक्षणक्रम पुन्हा सुरु झाल्याबद्दल अभिनंदनाचा ठराव करण्यात आला. व प्रवेशित विद्यार्थ्यांची नोंद घेण्यात आली.

४४.३.२ विषय क्रमांक बी.-१ / एफ -१७५ / २०१५ /०२

विद्यापीठाच्या धोरणात्मक निर्णयानुसार विद्याशाखेतील सर्व शिक्षणक्रमांच्या प्रमाणीकरणाबाबत...

टिप्पणी - शिक्षणशास्त्र विद्याशाखेतील प्रमाणपत्र .पदविका, पदवी व पदव्युत्तर पदवी सर्व शिक्षणक्रमांच्या शुल्कांची पुर्नरचना विद्यापीठ धोरणानुसार नव्याने करण्यात आली. सदर नविन तक्ता मान्यतेसाठी सादर

ठराव - विद्याशाखा परिषदेने सर्व शिक्षणक्रमांच्या शुल्क पुर्नरचनेच्या तक्त्यास मान्यता देऊन वित्त समितीपुढे तो ठेवण्याची शिफारस केली.

४४.३.३ विषय क्रमांक बी.-१ / एफ -१७५ / २०१५ /०३

बी.एड.संदर्भात

अ) एन.सी.टी.ई.नियमानुसार बी.एड.शिक्षणक्रम पुर्नरचनेत समाविष्ट केलेल्या वैकल्पिक विषय,प्रात्यक्षिक कार्य,सर्व सैध्दांतिक विषयांची सत्र निहाय केलेली रचना व मूल्यमापन योजनेस मान्यता मिळणेबाबत...(सहपत्र -३)

टिप्पणी - एन.सी.टी.ई.ने २०१५ पासून नविन अभ्यासक्रम चौकटीनुसार बी.एड.शिक्षणक्रम कार्यवाहीचे आदेश सर्व विद्यापीठांना निर्गमीत केले, त्या अनुषंगाने शिक्षणशास्त्र विद्याशाखेने आपल्या बी.एड.शिक्षणक्रमात सहपत्र क्र. ३ दिल्याप्रमाणे एकूण दहा विषय निश्चित करुन त्यांची दोन सत्रात विभागणी केली. वैकल्पिक विषयातही दहा विषय समाविष्ट केले. त्यानुसार प्रात्यक्षिकांची तसेच मूल्यमापन योजनेची पुर्नरचना करण्यात आली.

ठराव - शिक्षणशास्त्र विद्याशाखेने तयार केलेल्या दस्तऐवजावर चर्चा करुन त्यात 'पर्यावरण विषय 'श्रेयांक तत्वावर समावेश करावा र
सूचनेसह मान्यता देण्यात आली व सदर विषय विद्वत परिषदेकडे मान्यतेची शिफारस

## ४४.३.४ विषय क्रमांक बी.-१ / एफ -१७५ / २०१५ /०४

विशेष बी.एड.संदर्भात अभ्यासक्रम चौकट लेखक, संपादक नावे, शिक्षणक्रम अंमलबजावणी व अभ्यासकेंद्र मान्यतेबाबत...(सहपत्र - ४,५,६,७)

टिप्पणी :- विशेष बी.एड. शिक्षणक्रम शिक्षणशास्त्र विद्याशाखेत नव्याने सुरु करण्यात येत आहे. सदर शिक्षणक्रमाचे पूर्णत: विकसन कार्य मे २०१५ पर्यंत डॉ.कविता साळुंके यांनी त्यांचा प्रोजेक्ट म्हणून पुर्ण केले. परंतु मे २०१५ मधे आर.सी.आय.मार्फत नविन अभ्यासक्रम चौकट प्रसिध्द करण्यात आली. त्यानुसार पुन्हा सदर अभ्यासक्रमाची पुर्नरचना करण्यात आली. विकसीत केलेल्या नविन अभ्यासक्रम चौकटीतील विषयांचे अध्ययन साहित्य पूर्नरचना व काही त्यानंतर तयार केलेली नविन अभ्यासक्रम चौकट व लेखक संपादक यादी चर्चा व मान्यतेसाठी सहपत्र - ७ मधे देण्यात आली आहे.तसेच या शिक्षणक्रमाच्या कार्यवाहीचे नियम आणि प्रथम तुकडीसाठीची अभ्यासकेंद्रही सहपत्र क्र. ४,५ व ६ मधे निश्चित करण्यात आली आहेत. ते चर्चा व मान्यतेसाठी सादर ....

ठराव - विशेष बी.एड.ची कार्यवाही करतांना त्याबाबत शासन वेळोवेळी जे नियम निर्गमित करेल त्याच्या आधीन राहून या शिक्षणक्रमाची पुर्नरचित अभ्यासक्रम चौकट कार्यवाही योजना, अभ्यासकेंद्र व लेखक संपादक यादीस मान्यता देऊन विद्वत परीषदेच्या मान्यतेची शिफारस करण्यात आली.

## ४४.३.५ विषय क्रमांक बी.-१ / एफ -१७५ / २०१५ /०५

एम.एड.शिक्षणक्रम स्थगितीबाबत...

टिप्पणी - एन.सी.टी.ई कडून दूरशिक्षणाद्वारे एम.एड.कार्यान्वित करु नये.असे परीपत्रक असल्यामुळे २०१५ पासून एम.एड.शिक्षणक्रम स्थगित करण्यात आले आहे.

ठराव - एन.सी.टी.ई कडून दूरशिक्षणाद्वारे एम.एड.शिक्षणक्रम बंद करण्यात आल्याची नोंद घेण्यात आली. त्याचबरोबर एन.सी.टी.ई कडे सदर शिक्षणक्रम पुन्हा सुरु करणेसाठी पाठपुरावा करण्यात यावा असेही सुचीत करण्यात आले.

४४.३.६ विषय क्रमांक बी.-१ / एफ -१७५ / २०१५ /०६

बालसंगोपन आणि रंजन शिक्षणक्रम प्रवेश पात्रता बदल तसेच अभ्यासकेंद्र मानधन वितरण नव्या योजनेस मान्यता देणेबाबत ....सहपत्र ८

टिप्पणी - विद्यापीठाच्या विविध शिक्षणक्रमातील सर्व स्तरावरशिक्षणक्रम शुल्कात एक वाक्यता आनणेसाठी डॉ.वडनेरे समिती कार्यरत होती. त्यांनी सूचित केलेल्या मार्गदर्शक तत्त्वानुसार बालसंगोपन व रंजन शिक्षणक्रम अभ्यासकेंद्र शुल्कात रु.५७५/- वाढ करण्यात आली.त्यानुसार अभ्यासकेंद्र मानधन वितरणात वाढ करुन सदर तक्ता सहपत्र क्र. ८ मधे चर्चा व मान्यतेसाठी सभेपुढे ठेवण्यात आला.

ठराव - * सदर शिक्षणक्रम अभ्यासकेंद्र मानधन वितरण तक्त्यास चर्चेअंती मान्यता देण्यात आली सदर तक्ता वित्त समितीपुढे मान्यतेसाठी ठेवावा अशी शिफारस करण्यात आली.

* तसेच या शिक्षणक्रमाचा मोठ्या प्रमाणात अंगणवाडी सेविकांना लाभ घेता यावा यासाठी या शिक्षणक्रमाची प्रवेश पात्रता १० वी पास करण्यास मान्यता देण्यात आली व सदर प्रस्ताव मान्यतेसाठी विद्वत परिषदेकडे पाठवण्याची शिफारस करण्यात आली.

४४.३.७ विषय क्रमांक बी.-१ / एफ -१७५ / २०१५ /०७

अ) शालेय व्यवस्थापन पदविका शिक्षणक्रमाच्या विद्यार्थी सेवा कल्याण व गुणवत्ता विकास पुस्तक लेखन करणाऱ्या लेखकांच्या नावांना मान्यता (सहपत्र १०)

ब) शालेय व्यवस्थापन पदविका शिक्षणक्रमाची परीक्षा वर्षातून दोन वेळा घेण्यास मान्यता

क) अभ्यासकेंद्र शुल्क वितरण तक्त्यास मान्यता मिळावी (सहपत्र ११) यासाठी सादर

टिप्पणी - * शालेय व्यवस्थापन पदविका शिक्षणक्रमाचे पुर्नरचना करण्याचे कार्य हाती घेण्यात आले आहे. या शिक्षणक्रमातील 'विद्यार्थी सेवा कल्याण व गुणवत्ता विकास' या शिक्षणक्रमाच्या लेखनासाठी लेखक समिती गठीत करण्यात आली. ती यादी सहपत्र १० मधे चर्चा व मान्यतेसाठी सादर.

* शालेय व्यवस्थापन पदविका शिक्षणक्रमाची अंतिम परीक्षा वर्षातून एकदाच आयोजित केली जाते. त्यामुळे या शिक्षणक्रमाला नापास होणाऱ्या विद्यार्थ्यांना वर्षभर तिष्ठत रहावे लागते. याचा विचार करता सदर शिक्षणक्रमाची अंतिम परीक्षा इतर शिक्षणक्रमाप्रमाणेच वर्षातून दोनदा आयोजीत करण्यात यावी.

* डॉ.वडनेरे समितीच्या शुल्क विवरण मार्गदर्शक तक्त्यानुसार विद्याशाखेतील शालेय व्यवस्थापन पदवीका शिक्षणक्रमाचे शुल्क रु.३०००/- करण्यात आले. त्यात अभ्यासकेंद्र शुल्कातही वाढ करण्यात आली. त्याचा विचार करुन

अभ्यासकेंद्र मानधन विवरण तक्त्यात बदल करण्यात आले. ते बदल सहपत्र ११ मध्ये देण्यात आले आहेत. चर्चा व मान्यतेसाठी सादर..

ठराव - शालेय व्यवस्थापन पदविका या शिक्षणक्रमाची परीक्षा वर्षातून दोन वेळा घेण्यास मान्यता द्यावी. तसेच विद्यार्थी सेवा व गुणवत्ता विकास या शिक्षणक्रमाचे पाठ्यक्रम विकसन व लेखन समितीस मान्यता देऊन सदर विषय विद्वत सभेपुढे चर्चा व मान्यतेसाठी पाठविण्याची शिफारस करण्यात आली. शुल्क वाढीमुळे मानधन वितरणात बदल केलेल्या सहपत्रास मान्यता देण्यात आली. व सदर विषय वित्त समिती पुढे मान्यतेसाठी ठेवण्याची शिफारस करण्यात आली.

४४.३.८ विषय क्रमांक बी.-१ / एफ -१७५ / २०१५ /०८

मा.अध्यक्षांच्या परवानगीने इतर विषय

* विद्याशाखेतील प्रा.विजया पाटील व प्रा. माधवी धारणकर यांना शिक्षणशास्त्र विद्याशाखेतून पीएच.डी. पदवी प्रदान झाल्याने त्यांच्या अभिनंदनाचा ठराव करण्यात आला.

*शिक्षणशास्त्र विद्याशाखेतील प्रमाणपत्र शिक्षणक्रमांना विद्यापीठातील इतर प्रमाणपत्र शिक्षणक्रमाप्रमाणे प्रमाणपत्र देण्यात यावे. असे ठरविण्यात आले.

*एस्.सी.ई.आर.टी. संदर्भात विकसीत केलेले माहिती संप्रेषण व तंत्रविज्ञान व प्रा.शिक्षक नेतृत्व हा भाग सध्याच्या शालेय व्यवस्थापन पदविका शिक्षणक्रमात समाविष्ट करता येतो का ते पाहून पुढील परिषदेत सदर विषय ठेवावा. असे सुचित करण्यात आले. त्यानंतर सर्व सदस्यांचे आभार मानून बैठक संपली असे घोषीत करण्यात आले.

डॉ.कविता साळुंके

सचिव, शिक्षणशास्त्र विद्याशाखा परिषद

डॉ. संजीवनी महाले

प्र.संचालक

शिक्षणशास्त्र विद्याशाखा